## साहित्य : **रा. शं. दातार विशेष नाट्य पुरस्कार**
## मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : मकरंद साठे



आज मराठी रंगभूमी परत एकदा ताकदीने उभी राहू पाहत आहे.
हे चित्र आशादायक आहे आणि त्यामागचं कारण आहे
आजच्या तरुण पिढीची प्रचंड ऊर्जा, हे नि:संशय. परंतु त्याच वेळी ही नवी पिढी–
काही मोजके अपवाद वगळता– इतिहासापासून तीव्रपणे तुटलेली आणि
वैचारिकताविरोधी अशी झालेली दिसते. ‘आम्हाला नवे काही तरी करायचे आहे,
आम्हाला काय इतिहासाचे’, अशी स्पष्ट विधानेही कानांवर येतात.
वरवर पाहता, ही बंडखोरी वाटते आणि बंडखोरी मला केवळ मान्यच आहे असे नव्हे,
तर कुठल्याही चांगल्या कलाकृतीमागे काही किमान बंडखोर जाणिवा असतात,
असे मला वाटते. परंतु बंडखोरी अनैतिहासिकेतून कधीच उभी राहत नसते.
त्यातून उभा राहतो तो स्थितिवाद आणि कळत वा नकळत आजचा तरुण वर्ग
त्याला मोठ्या प्रमाणात बळी पडताना दिसू लागला आहे,
असे माझे व्यक्तिगत मत आहे.

# स्थितिवादी व शून्यवादी धारणेला छेद देण्याचा प्रयत्न

आजचा काळ रंगभूमीच्या आणि कादंबरीच्या इतिहासातला पडता काळ, असे सर्वसाधारण मत आहे. अशा काळातला मी एक लेखक आहे; पण त्याच वेळी मला खरोखरच काही वेगळे अर्थ लागताहेत, अशी माझी धारणा होती आणि आहे- मग त्याच्या मर्यादा काहीही असोत. त्यातूनच मी हे धाडस केले. हे धाडस करण्यामागे अजूनही एक कारण आहे. सद्य:स्थिती ही 'क्रायसिस'ची स्थिती आहे, असे बहुतेक विचारवंतांचे म्हणणे आहे. मला ते मान्य आहे. परंतु 'क्रायसिस'ची स्थिती ही एक मोठी संधीही असते, असे माझे मत आहे.

महाराष्ट्र फाउंडेशनकडून मला दुसऱ्यांदा पुरस्कार मिळत आहे; शिवाय हा पुरस्कार 'विशेष पुरस्कार' म्हणून मिळत आहे, त्याबद्दल मी सर्वप्रथम त्यांचे आभार मानतो.

एखादे बक्षीस मिळाल्यावर त्यावर प्रतिक्रिया देताना वा त्यानिमित्ताने मनोगत व्यक्त करताना लेखक म्हणून काय बोलावे, हा प्रश्न मला नेहमीच पडतो. कुठलाही चांगला लेखक बक्षीस मिळविण्यासाठी लिहीत नसतो. त्याला आपल्याजवळ काही सांगण्यासारखे आहे असे वाटत असते, ते इतरांना सांगणे प्राप्त आहे अशी त्याची धारणा असते; म्हणून तो लिहितो. पण याचाच अर्थ असा की, त्याला ते 'इतर कोणाला तरी' सांगायचे असते. म्हणजे पर्यायाने प्रत्येक कलाकृती वा साहित्यकृती ही एक सामाजिक क्रिया असते. थोडक्यात, कुठलाही चांगला लेखक पुरस्कार मिळविण्यासाठी लिहीत नसला तरी तो मिळणे- विशेषत: ज्या व्यक्ती वा संस्था त्याला महत्त्वाच्या, आदरणीय वाटतात त्यांच्याकडून मिळणे- ही एक आनंददायक बाब असते. पण हा आनंद अभिव्यक्त करून आभार मानल्यानंतर पुढे अधिक काय बोलावे, हा प्रश्न उरतोच. तरीही काही सांगायचे तर त्या पुस्तकाची निर्मिती करण्याबाबत माझी काय भूमिका होती, हे थोडक्यात मांडणे आणि त्यात मला मदत केलेल्या काही संस्था व व्यक्तींचे आभार मानणे योग्य होईल, असे मला वाटते.

पहिला मुद्दा असा की- मी काही कोणी इतिहासकार वा राज्यशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ नव्हे; विचारवंत वगैरे तर नव्हेच नव्हे, याची मला पूर्ण जाणीव आहे. मी एक ललित लेखक आहे. मग मी हा इतिहास- तो ही सामाजिक- राजकीय अंगाने- लिहिण्याच्या फंदात का पडलो? एक कारण असे की, ललित लेखकाने वैचारिकतेपासून फटकून राहिले पाहिजे; राजकारण, समाजकारणविषयक तत्त्वविचारापासून, सैद्धांतिक विचारांपासून स्वत:ला दूर ठेवले पाहिजे- असे मला वाटत नाही. किंबहुना, आपल्या कुवतीनुसार काही किमान पातळीवरचा असा विचार ललित लेखनासाठी आवश्यकच आहे, अशी माझी धारणा आहे. त्याचप्रमाणे ललित लेखकांची जीवनदृष्टी सामाजिक शास्त्रज्ञांहून वेगळ्या प्रकारची असल्याने, त्यांचे परिप्रेक्ष्यच वेगळे असल्याने वैचारिक बाबतीतही ललित लेखक काही योगदान देऊ शकतात; नव्हे, त्यांनी ते तसे देणे- एका प्रकारे स्वत:चा मॅनिफेस्टोच मांडणे- हे त्यांचे कर्तव्यच आहे, असे मी मानतो. या धारणेतून मी हा इतिहास मांडला आहे. म्हणजे थोडक्यात असे की, हा एका ललित लेखकाने एका आंतरिक ओढीतून घेतलेला

आढावा आहे; एखाद्या सामाजिक शास्त्रज्ञाने आपले व्यावसायिक कौशल्य आणि शिक्षण वापरून केलेली मांडणी नव्हे. अर्थात, हे करीत असता वैचारिक शिस्त पाळण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला आहे.

दुसरा मुद्दा असा की– हे सर्व मान्य केले तरीही त्याचा अर्थ मी अशा इतिहासलेखनाचा प्रयत्न करावा, असा होत नाही. मला एक ललित लेखक म्हणून पडलेले काही प्रश्न या खटाटोपाला कारणीभूत झाले. हे प्रश्नही काही जगावेगळे नव्हेत, जवळजवळ प्रत्येकच ललित लेखकाला आणि कलावंतालाही ते पडत असणार. त्यातले मूलभूत प्रश्न दोन– मी का लिहितो? आणि चांगलं साहित्य कशाला म्हणावं? या सामान्य वाटणाऱ्या प्रश्नांतूनच पुढचे अधिक खोलवरचे प्रश्न मग स्वाभाविकपणे उद्‌भवतात. मी नक्की कुठल्या परंपरांचा पाईक आहे आणि त्यांना मी नक्की कुठले वळण देऊ पाहत आहे? या प्रश्नापासून ते त्याहूनही अधिक खोलातल्या अशा मूलभूत प्रश्नापर्यंत– 'मी कोण?' या सर्वांत कळीच्या आणि अनेक आयाम असणाऱ्या प्रश्नापर्यंत– अनेक प्रश्न उद्‌भवतात.

मी केलेला हा इतिहासाचा अभ्यास म्हणजे या प्रश्नांच्या उत्तरार्थ झालेला माझा प्रवास आहे. त्याला काही ठोस स्वरूप– अभ्यासालाही आणि प्रत्यक्ष मांडणीलाही– २००९ आणि २०१० या दोन वर्षांत आलेलं असलं, तरी त्याची सुरुवात उघडपणे कित्येक वर्षांपासून झालेली आहे. मग आत्ताच या प्रवासाला असं स्वरूप येण्याचं कारण काय? एक कारण असं की– अशी ऐतिहासिक, विशेषत: सामाजिक अंगाने असणारी मांडणी मराठी नाटकाबाबत झालेली नाही. माझ्या या उत्तराच्या शोधातल्या प्रवासात ही उणीव गेली अनेक वर्षे पदोपदी जाणवत होती. या ग्रंथाच्या मांडणीमागचं हे एक महत्त्वाचं कारण आहे. इतिहासकार म्हणून, समाजशास्त्राचा विद्यार्थी म्हणून माझ्या असणाऱ्या मर्यादांपेक्षाही ही उणीव अधिक दबाव निर्माण करणारी ठरली आणि मी या पुस्तकाचे लिखाण करण्याचे ठरवले. सुरुवातीस त्याचा आवाका एवढा मोठा व्हावा, अशी योजना अर्थातच नव्हती. तो तसा झाला याचे एकमेव कारण म्हणजे, मराठी नाट्यपरंपरेची श्रीमंती आणि तिच्यातली विविधता. माझ्या परीने मी त्यातील सर्व प्रवाहांना भिडण्याचा प्रयत्न केलेला आहे– विशेषत: त्यातल्या उपेक्षित, दुर्लक्षित पण महत्त्वाच्या प्रवाहांना. मध्यमवर्गीय मर्यादांबाहेर जाण्याचा प्रयत्न अर्थातच सोपा नाही. वर्गाच्या– आणि जाती-वर्णाच्याही– मर्यादा उल्लंघून जाणे सोपे नसतेच. त्या मी उल्लंघून जाण्यात कुठे ना कुठे कमी पडलो असण्याचीही दाट शक्यता उरते. एक समाजशास्त्रज्ञ म्हणून शास्त्रीय पद्धतीनं अभ्यास न झाल्यातून उद्‌भवलेल्या मर्यादांप्रमाणेच याही मर्यादा या अभ्यासाला असणार, हे मला मान्य आहे. परंतु त्याबरोबरच खरोखर महत्त्वाचे असेही काही मला सांगायचे आहे, असाही माझा विश्वास आहे. हा विश्वासच लेखकाला लेखक बनवत असतो. मी का लिहितो, याचे हे सर्वांत महत्त्वाचे उत्तरही आहे. याच कारणाने मी आजतागायत लिहीत आलो. आजचा काळ रंगभूमीच्या आणि कादंबरीच्या इतिहासातला पडता काळ, असे सर्वसाधारण मत आहे. अशा काळातला मी एक लेखक आहे; पण त्याच वेळी मला खरोखरच काही वेगळे अर्थ लागताहेत, अशी माझी धारणा होती आणि आहे– मग त्याच्या मर्यादा काहीही असोत. त्यातूनच मी हे धाडस केले. हे धाडस करण्यामागे अजूनही एक कारण आहे. सद्य:स्थिती ही 'क्रायसिस'ची स्थिती आहे, असे बहुतेक विचारवंतांचे म्हणणे आहे. मला ते मान्य आहे. परंतु 'क्रायसिस'ची स्थिती ही एक मोठी संधीही असते, असे माझे मत आहे. कुठल्याही लेखकासाठी आजचा कालखंड अत्यंत आव्हानात्मक आहे हे खरेच; पण म्हणूनच तो अत्यंत एक्साइटिंग, उद्युक्त करणाराही आहे. इतिहासाचा परत एकदा नव्यानं अर्थ लावायला भाग पाडणाराही आहे. या प्रयत्नामागचे हेही एक महत्त्वाचे कारण.

अजूनही एक कारण आहे– आज मराठी रंगभूमी परत एकदा ताकदीने उभी राहू पाहत आहे. हे चित्र आशादायक आहे आणि त्यामागचं कारण आहे आजच्या तरुण पिढीची प्रचंड ऊर्जा, हे नि:संशय. परंतु त्याच वेळी ही नवी पिढी– काही मोजके अपवाद वगळता– इतिहासापासून तीव्रपणे तुटलेली आणि वैचारिकताविरोधी अशी झालेली दिसते. 'आम्हाला नवे काही तरी करायचे आहे, आम्हाला काय इतिहासाचे', अशी स्पष्ट विधानेही कानांवर येतात. वरवर पाहता, ही बंडखोरी वाटते आणि बंडखोरी मला केवळ मान्यच आहे असे नव्हे, तर कुठल्याही चांगल्या कलाकृतीमागे काही किमान बंडखोर जाणिवा असतात, असे मला वाटते. परंतु बंडखोरी

अनैतिहासिकेतून कधीच उभी राहत नसते. त्यातून उभा राहतो तो स्थितिवाद आणि कळत वा नकळत आजचा तरुण वर्ग त्याला मोठ्या प्रमाणात बळी पडताना दिसू लागला आहे, असे माझे व्यक्तिगत मत आहे. त्याच्यात प्रचंड ऊर्जा आहे, हेवा वाटावा अशी कल्पकता आणि सुप्त सर्जनशीलताही आहे; पण त्याच्याच जोडीला ही स्थितिवादी आणि शून्यवादी धारणाही आहे. माझ्या जीवनदृष्टीनुसार या जाणिवांना छेद देण्याचा प्रयत्न करणे अनिवार्य आहे. या दिशेने एक पाऊल जरी पडले तरी माझा हेतू सफल झाला, असे मला वाटेल. म्हणूनच हे पुस्तक जिने नुकतेच तारुण्यात पदार्पण केले आहे अशा माझ्या मुलीला आणि त्याचबरोबर तिच्या आसपासच्या सर्वच तरुण पिढ्यांना मी अर्पण केले आहे.

अशा स्वरूपाचे काम अनेकानेक व्यक्तींच्या आणि संस्थांच्या सहभागाशिवाय अशक्यच आहे, हे उघड आहे. त्यांचा ऋणनिर्देश केलाच पाहिजे, कारण त्यांचा वाटा फार मोठा आहे. सर्वांचा उल्लेख येथे करणे शक्य नाही, तो पुस्तकात केलाच आहे.

सर्वप्रथम उल्लेख केला पाहिजे तो बंगलोरच्या 'इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट्स' या संस्थेचा. त्यांनी दिलेल्या अभ्यासवृत्तीशिवाय हे काम शक्य नव्हते. हे पुस्तक प्रकाशित करणे, ही सोपी गोष्ट नव्हती. प्राज फाउंडेशनने त्यासाठी अर्थसाह्य दिले आणि पॉप्युलर प्रकाशनाने ही जोखीम उचलली. त्याचप्रमाणे माझे मित्र आणि प्रसिद्ध चित्रकार श्री.सुधीर पटवर्धन यांनी काहीही मोबदला न घेता याच्या मुखपृष्ठासाठी एक नवे चित्र तर रंगवलेच, पण आतील प्रत्येक प्रकरणासाठी आपली अप्रतिम रेखाचित्रे उबलब्ध करून दिली, त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

संदर्भ मिळवून देण्याबाबत तर असंख्य लोकांनी मदत केली. त्यांची यादी इथे देणं शक्य नाही. असे काम प्रसिद्ध होण्याआधी निदान काही जाणकारांनी, तज्ज्ञांनी ते वाचून त्यावर टीका-टिप्पणी करणे, सूचना करणे आवश्यक असते. प्रा.राम बापट, श्री.समर नखाते, श्री.चंद्रशेखर पुरंदरे, श्री.अतुल पेठे, श्री.गजानन परांजपे, डॉ.शांता साठे यांनी संपूर्ण ग्रंथ वाचला. त्यांच्याशी केलेल्या चर्चांचा मला मोठाच फायदा झाला. एकंदरीनेच आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि विशेषत: ज्या कुटुंबातील सर्वच व्यक्ती गंभीरपणे व बांधिलकीने स्वत:च्या व्यवसायात गुंतलेल्या असतात अशा घरात सर्वांनीच एकमेकांना साह्य केले, तरीही परिस्थिती किती बिकट असते याचा अनुभव अनेकांना आला असेल. त्यातही एखाद्या व्यक्तीने असे काम अंगावर घेतले तर इतरांवर किती दडपण येते, ते सांगणयाचीही आवश्यकता नाही. माझी पत्नी आणि मुलगी यांनी त्यासंबंधी कधी वाच्यता केली नसली तरी त्यांच्यावरही ते आलेच असणार, याची मला पूर्ण जाणीव आहे; पण त्यांचे आभार तरी कसे मानावेत?

**मकरंद साठे**

Email : makadhan@vsnl.com

Mob.: 9822042172

ओळख
**मकरंद साठे**

# ते पुढे आहेत...

## अतुल पेठे

मकरंद साठे यांना 'महाराष्ट्र फाउंडेशन' पुरस्कार दुसऱ्यांदा मिळत आहे. 'ते पुढे गेले' नाटकाकरिता पहिला होता आणि हा 'मराठी रंगभूमीच्या तीस रात्री' या नाट्यविषयक लेखनाकरिता आहे. त्याबद्दल त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. आता येथून पुढे मी मकरंद साठे यांना आमच्या प्रदीर्घ मैत्रीच्या आणि प्रेमाच्या हक्काने मकरंद असे एकेरी नावाने संबोधेन, कारण ते जास्त सहज होईल.

आज पुरस्कार मिळत असलेल्या 'मराठी रंगभूमीच्या तीस रात्री' या ग्रंथावर मी लोकसत्तेत तीन प्रदीर्घ लेख गेल्या वर्षी लिहिलेले होते. तेव्हा ती पुनरुक्ती टाळावी, म्हणून मकरंदबद्दल या निमित्ताने मी लिहिणार आहे. माझ्याकरिता म्हटले तर हे काम अवघड आणि म्हटले तर सोपे आहे. अवघड अशासाठी की– त्याच्या लेखनातील वैचारिक, सामाजिक, राजकीय आणि जागतिक अर्थ उकलून दाखविण्याची माझी बौद्धिक कुवत नाही. पण त्याच्याविषयी लिहिणे सोपे अशासाठी की– मी त्याच्यासह अनेक वर्षे काम करीत आहे. ते काम करताना त्याचे साहित्य मला कसे उलगडले, हे सांगणे अवघड नाही. माणूस आणि साहित्य उमगले, तरच कोणाही दिग्दर्शकाला लेखकाचे लेखन रंगमंचावर उलगडून दाखविता येते. आता ज्या अर्थी त्याने त्याचे बरेचसे काम माझ्या हाती सुपूर्त केले, त्या अर्थी कदाचित त्याला अपेक्षित असलेला अर्थ त्यातून बाहेर येत असणार. थोडक्यात, त्याच्या लेखनाला मी माझ्या परीने न्याय आणि काहीसा अर्थ निश्चित दिलेला असणार. या खात्रीवर मी त्याच्याविषयी माझ्या पद्धतीने लिहू पाहतो.

सुरुवातीलाच मी आणि त्याने केलेल्या कामांची यादी देतो. ती यादी अशासाठी की, महाराष्ट्रात मराठी रंगभूमीवर क्वचितच दुसऱ्या एखाद्या जोडीने इतके विविध अंगी प्रयोगशील काम केलेले असेल. मकरंदच्या नाटकातील अभिनेता म्हणून मी 'सापत्नेकराचे मूल', 'ठोंब्या', 'गोळायुग', 'चौक', 'सूर्य पाहिलेला माणूस' यांत काम केले आहे. दिग्दर्शक म्हणून मी त्याची 'ऐसपैस सोयीने बैस', 'सूर्य पाहिलेला माणूस', 'चौक', 'गोळायुग' 'दलपतसिंग येती गावा' ही नाटके दिग्दर्शित केली. मकरंदने नेपथ्यकार म्हणून माझ्या 'सूर्य पाहिलेला माणूस', 'चौक', 'उजळल्या दिशा', 'आनंदओवरी' नाटकांचे काम केले. विजय तेंडुलकरांवर 'तेंडुलकर आणि हिंसा (काल आणि आज)' हा माहितीपट मी केला. त्याच्या पटकथेचे सहलेखन आणि मुलाखतीचे काम त्याने केले. त्याने 'समाधान आणि इत्यादी' नावाचा माहितीपट केला, त्याचे छायाचित्रण मी केले. त्याच्या 'सापत्नेकराचे मूल' नाटकावर सौमित्र रानडेंनी चित्रपट बनविला. त्यात मी एका मुख्य भूमिकेत होतो. याव्यतिरिक्त आम्ही दोघांनी एकमेकांच्या सर्व कामांमध्ये रस घेऊन एकमेकांना सर्जनशील मदत केलेली आहे.

आम्ही जवळजवळ गेली पंचवीस वर्षे एकत्र काम करीत आहोत. या साऱ्या प्रवासात अनेक चढ-उतार आणि ताण-तणाव आम्ही अनुभवले आहेत. कौतुक, प्रेम, आनंद, राग, तीव्र मतभेद, सहमती ते अबोला– असे अनेक पदर त्यांत आहेत. मात्र या साऱ्यांत जगण्याविषयी आणि करीत असलेल्या कामाविषयी उत्कट, प्रखर संवेदना मात्र केंद्रस्थानी आहेत. सुरुवातीची अनेक वर्षे कमालीची हेटाळणी आणि पुणेरी टिंगलटवाळी आम्ही पचवली आहे. अर्थात ही परिस्थिती आता गेल्या काही वर्षांत पालटली आहे. मकरंदच्या माझ्या या वैयक्तिक मैत्रीबरोबर त्याच्या आई-वडिलांशी माझे वेगळे नाते आहे. डॉ. अनंत साठे आणि शांता साठे या दांपत्याशी मी आरोग्यशिक्षण आणि संवादाच्या माध्यमातून जोडला गेलेलो आहे.

मकरंदला मी प्रथम पाहिले ते थिएटर अकादमीने फोर्ड फाउंडेशनच्या अर्थसाह्याने घेतलेल्या लेखन कार्यशाळेत. त्या लेखन कार्यशाळेत मीही लेखक म्हणून सामील होतो. तिथे त्याचे 'चारशे कोटी विसरभोळे' हे नाटक प्रथम वेळी जमलेल्या लोकांनी त्या नाटकावर विविध मते मांडली. प्रा. राम बापट यांनी त्यातील अर्थ उलगडवून दाखवले.

माझ्याकरिता ते सारेच त्या वेळी नवे होते. मला त्या नाटकातील एक गोष्ट उमजली होती की, हे आमच्या काळाचे नाटक आहे. आजच्या समाजाच्या गोचीचे नाटक आहे. ते नव्वदचे दशक होते. जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरणाची सुरुवात होती. नवे बदल झपाट्याने येऊ घातले होते. संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विस्फोटाचे महाद्वार त्या वेळेस उघडे होऊ पाहत होते. त्या पार्श्वभूमीवर हे नाटक आम्हा साऱ्यांच्या संवेदनेचे होते. तर, ही आमच्या ओळखीची सुरुवात.

एक दिवस मला समर नखातेंनी मकरंदच्या नव्या नाटकात अभिनेता म्हणून घेतले. नाटकाचे नाव 'सापत्नेकराचे मूल'. हे नाटकही अजब होते. वास्तव जगणे आणि स्वप्नवत् जगणे याच्या सीमारेषेवर ते नाटक फेर धरीत होते. या नाटकाच्या आठ-दहा महिने तालमी झाल्या आणि प्रयोग तीन. पण या नाटकाचे फार सुरेख मंचन केले गेले होते. मला ते नाटक आतूनच कळले होते. माणसाच्या आत-बाहेरच्या जगाविषयी चाललेल्या मनोव्यापारांचे दर्शन त्या नाटकात होते. त्यातील विदूषक आणि देव या अचाट पात्रांनी इथल्या मर्त्य मानवांचे जग व्यापलेले होते. मकरंदच्या सुरुवातीच्या नाटकांत ही अशी 'रिअल-सररिअल' सरमिसळ आपल्याला दिसते. आपल्या अस्तित्वाचे अर्थ काय, या प्रश्नाची त्याची ही सुरुवातीची नाटके होती. मात्र नंतरची नाटके आपल्या अस्तित्वाचे अर्थ काय, या प्रश्नाच्या उत्तरांची होती, असे मला वाटते. या नाटकाच्या तालमींमध्ये माझ्या कानांवर अनेक संदर्भ येत होते. नखातेंनी मला त्या वेळेस साल्वादोर दाली, फेलिनी आणि तारकोव्हस्कीचे चित्रपट दाखवले होते. या साऱ्यांशी ते या नाटकाचा संबंध जोडायचे. ते मला उपयोगी निश्चित पडले. पण तरीही मला मकरंदचे लेखन समजावून घ्यायला माझे आयुष्य कामी यायचे. मध्यमवर्गीय समाज, त्याच्या आशा-आकांक्षा, त्याची घोर निराशा, त्यांच्यातील कंटाळवाणेपण आणि नकोसेपण, त्यांच्यातील संवेदन आणि असंवेदनशीलता, व्यक्तींची व्याकुळता आणि मुख्य म्हणजे निरर्थकता-सार्थकता मला त्या नाटकात ठायी-ठायी जाणवे. एका अर्थाने मकरंदचे सुरुवातीचे हे लेखन सतीश आळेकर, श्याम मनोहर आणि बा. सी. मर्ढेकरांच्या शैलीशी नाते सांगणारे आहे, मला वाटायचे. वास्तव आणि स्वप्नवास्तव यांच्या गोंधळातून त्याची नाटके आकाराला आली होती.

मी नाशिकला 'प्रयोग परिवार'तर्फे त्याचे 'ऐसपैस सोयीने बैस' हे नाटक केले. हे नाटक म्हणजे गमतीदार होते. त्याच्या आधीच्या नाटकांहून वेगळे. यात एका लग्नाळू मुला-मुलीचा वरवरचा बंडखोरपणा आणि अर्थ गमावलेली हातमिळवणी याबद्दल गंमत उडवलेली होती. पुण्यातील उच्च मध्यमवर्ग आणि त्यांचा कमालीचा भोंदूपणा यात दाखविला होता. 'ठोंब्या' हे नाटक त्यानेच दिग्दर्शित केलेले होते. हे नाटक कळायला मला तरी त्या वेळी जड गेले होते. मात्र जसजशा तालमी होऊ लागल्या तसतशी त्याची उकल मला झाली आणि माझा त्यातला सहभाग वाढत गेला. आज विचार करताना मला त्याचे हे नाटक उत्कृष्ट वाटते. आशय आणि रचनेच्या दोन्ही अंगांनी या नाटकात अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग होते. माणसाचे आयुष्य आणि संगणकीय तंत्रज्ञान यांचे नाते त्याने इथे जास्त वेगळ्या रीतीने दाखवले होते. तुकडे होत चाललेले जग आणि मानवीय भावभावनांचे होत असलेले विखंडीतीकरण इथे प्रखरपणे दर्शविले गेलेले होते. मुळात संगणकाला 'ठोंब्या' इतके सार्थ नाव त्याने देऊन आपले आजचे जगणे हे निरर्थक, रटाळ, कमअस्सल, बोथट, रोगट आणि सुजलेले झालेले आहे, हे सुचवले होते. याच धर्तीचे त्याचे नाटक 'गोळायुग' होते. सप्तचिरंजीव, त्यांचे अमरत्व आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अतिरेक - याभोवती ते नाटक होते. त्रेतायुग, द्वापारयुग, कलियुग तसे हे 'गोळायुग' - आजचे युग! लिबलिबित, आकारविहीन आणि अर्थहीन असे आजचे युग!! 'गोळायुग' हे नाटक त्याने दिग्दर्शित केले होते आणि मी त्यात एक मुख्य भूमिका केली होती. पुढे हे नाटक मी ललित केंद्रातील विद्यार्थ्यांकरिता केले होते. त्या वेळी आम्ही परत ते नव्याने लिहिलेही. त्याचा प्रयोग माझ्या मते, सर्वार्थाने अद्भुत होता. ही सारी नाटके कळायला आणि पचायला निश्चितच जड होती. नेहमीच्या पठडीतली नव्हती. लोकांच्या शिव्याशाप पचवून आम्ही ती केलेली होती. आमच्याकरितासुद्धा आशयाने आणि शैलीने आम्ही किती तग धरून राहू शकतो याची ती पराकोटीची परीक्षाच हाते. या टप्प्यावरच आम्ही 'सूर्य पाहिलेला माणूस' केले.

डॉ. श्रीराम लागू यांच्या सांगण्यावरून मी वसंत

पळशीकरांच्या 'सत्याग्रही सॉक्रेटिसचे वीरमरण' हे पुस्तक वाचले आणि ते मकरंदला वाचायला दिले. मकरंदने स्वतंत्रपणे मग 'सूर्य पाहिलेला माणूस' हे नाटक लिहिले. आजच्या काळाच्या परिप्रेक्ष्यातून सॉक्रेटिसचा अर्थ लावण्याचे काम मकरंदने त्यात केलेले होते. मी आधी उल्लेख केल्याप्रमाणे 'जगण्याचा अर्थ काय?' या प्रश्नाला उत्तर शोधायचा तिथे प्रयत्न होता. 'जगण्याचा अर्थ काय' याचा मथितार्थ 'मी माझ्या जगण्याला कसा अर्थ देऊ' हा तिथे होता. माझी कुठली कृती आजच्या काळात अर्थपूर्ण, जबाबदारीची आणि नैतिक ठरेल याचा तो शोध होता. हे नाटक त्याचे शंभर प्रयोग करून आम्ही सन्मानपूर्वक थांबविले. आज मराठी रंगभूमीवरील डॉक्टर लागू यांनी उभी केलेली 'सॉक्रेटिस' ही एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे, तर 'सूर्य पाहिलेला माणूस' हे मराठी लोकांनी विविध अर्थांनी वेळोवेळी वापरलेले सुभाषित वाक्य बनले आहे.

'चौक' हे नाटक आम्ही एकत्रित दिग्दर्शित केलेले, असेच कमालीचे वेगळे होते. अभिनेत्यांची कार्यशाळा घेऊन त्यातून मंथन करून आणि 'अच्युत आठवले आणि आठवण' ही त्याची कादंबरी हा त्याचा पाया धरून हे नाटक रचले गेले होते. एका चौकात 'ट्रॅफिक जॅम' आहे आणि तिथे विविध आर्थिक, सामाजिक, राजकीय स्तरांतली मंडळी एकत्र अडकून पडली आहेत. नाटकातील हा काळ दोन दंग्यांच्या मधला काळ आहे. कमालीची बोथट आणि कमालीची तीव्र भावनिक मंडळी या साऱ्या घटनेकडे कशी पाहतात, याविषयी हे नाटक होते.

या नाटकानंतर मी त्याच्या त्याने लिहिलेल्या पण न झालेल्या चित्रपटाच्या पटकथेचे नाट्यरूपांतर करून 'दलपतसिंग येती गावा' सादर केले. या लेखनात राजकुमार तांगडेही सहभागी झाला होता. नाटकाचा विषय होता अरुणा रॉय यांनी दिलेला माहितीच्या अधिकाराचा लढा. असा ज्वलंत विषय जालन्यातील आमच्या शेतकरी कलाकार मित्रांनी सादर केला होता. हे नाटक आम्हा साऱ्यांकरिता नवा प्रयोग होता. यानंतर त्याने 'ते पुढे गेले' हे नाटक लिहून सादर केले. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वेगळे विश्लेषण करणारे ते नाटक होते. तेही अर्थातच महत्त्वाचे ठरले. यानिमित्ताने एक नोंद इथेच करून ठेवतो. ती म्हणजे, आम्हा दोघांच्या कामात गजानन परांजपे या गुणी अभिनेत्याचा असलेला मुख्य सहभाग. काही मुले तर आम्हाला मजेने 'थ्री इडियट्स' म्हणत.

मला स्वत:ला असा लेखक कायमचा बरोबर असणे महत्त्वाचे वाटते. समकालीन संवेदना ज्याच्याबरोबर 'शेअर' करता येतात, असा लेखक सतत संगतीला असणे गरजेचेच असते. मकरंदचे लेखन मला महत्त्वाचे वाटत आले त्याचे मुख्य कारण म्हणजे त्यातले तत्त्वज्ञान हे आहे. मकरंदची नाटके नेहमीच्या माहिती असणाऱ्या पठडीतली नाटकीय नाहीत. त्याच्या नाटकांतले प्रश्न बहुस्तरीय, व्यामिश्र आणि अनेक घटकांना छेद देणारे आहेत. त्याच्या नाटकांची भाषा परिचित नाट्यमय नाही. ती अनलंकृत आहे. त्याची नाटके ही फक्त अनुभवावर अवलंबून नाहीत तर ती वैचारिक मांडणी करणारी आहेत. ती मांडणी एकांगी नाही किंवा कोणाचीही सहज-सोपी टरउडवी नाही. सुरुवातीची त्याची नाटके जर 'आयडियांची' असतील तर नंतरची 'आयडिऑलॉजी'बाबत आहेत, असे मला वाटते. त्याची नाटके करीत असताना मला दृष्टी आली आणि दृष्टिकोनही मिळाला.

तर असा हा आजपर्यंतचा प्रवास. कमालीच्या उत्साहाने, भयानक त्रासाने, जबर हट्टाने, तीव्र आग्रहाने, उत्कट व्याकुळतेने भरलेला आणि भारलेला. मला समाजाचे आणि मराठी रंगभूमीचे ठाऊक नाही; पण आमच्या या प्रवासाने माझ्या आयुष्याला अर्थपूर्ण केले. मकरंदने 'मराठी रंगभूमीच्या तीस रात्री' हे तीन खंड लिहून मराठी रंगभूमीचा राजकीय व सामाजिक इतिहास लिहिला आणि समीक्षात्मक नवा आयाम रचला, असे मला वाटते. विलक्षण बुद्धिमत्ता लाभलेला हा माझा मित्र मराठी रंगभूमीच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासातले एक पान निश्चित होऊन गेला आहे, याचा मला सार्थ अभिमान आणि आनंद आहे. नव्या पिढीला मकरंदची नाटके वाचताना नवे प्रयोग करायला धीर येईल आणि अशा वेळी त्यांना 'ते पुढे आहेत' असा विश्वास त्यातून निश्चित मिळेल, यात शंका नाही.

**अतुल पेठे**

Email : atul_pethe@hotmail.com

Mob.: 9422319717